POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०८ ● मुंबई, रविवार, ०१ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## तुमच्या आयुष्याशी संबंधित नियम १ मार्चपासून बदलणार

## रेल्वे तिकिटे, एलपीजी ते यूपीआय सिम... तुमच्या खिशावर होणार परिणाम

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

येत्या १ मार्चपासून सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित अनेक महत्त्वाच्या नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने रेल्वे आरक्षण, बँक ठेवी आणि वढक व्यवहारांशी संबंधित नियमांचा समावेश आहे. हे बदल केवळ प्रशासकीय नसून, त्यांचा थेट परिणाम तुमच्या महिन्याच्या बजेटवर आणि दैनंदिन आर्थिक नियोजनावर पडणार आहे.

१ मार्चपासून होणाऱ्या बदलांचा प्रभाव तुमच्या स्वयंपाकघरापासून ते थेट हातातल्या मोबाईल फोनपर्यंत दिसून येईल. यामध्ये सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे छढक्ष गॅस सिलेंडरच्या दरातील संभाव्य सुधारणा. दर महिन्याच्या सुरुवातीला गॅस कंपन्या किमतींचा आढावा घेतात, त्यामुळे घरगुती आणि व्यावसायिक सिलेंडरच्या किमती बदलू शकतात.

प्रवाशांसाठी रेल्वे तिकीट बुकिंगच्या प्रक्रियेत किंवा सॉफ्टवेअरमध्ये काही महत्त्वाचे बदल दिसू शकतात. कोणते कोणते बदल होणार आहेत जाणून घ्या.

### १. रेल्वे प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी

रेल्वे प्रवासाच्या तिकीट बुकिंग प्रणालीमध्ये १ मार्चपासून आमूलाग्र बदल होत आहे. आतापर्यंत लाखो प्रवासी जनरल आणि प्लॅटफॉर्म तिकिटांसाठी वापरत असलेले जुने वळर अस्रस्र पूर्णपणे बंद होणार आहे. त्याऐवजी, रेल्वे आता 'रेलवन ॲप' हे नवीन आणि अद्ययावत ॲप्लिकेशन लाँच करत आहे. या एकाच ॲपच्या माध्यमातून प्रवाशांना केवळ जनरल किंवा प्लॅटफॉर्म तिकीटच नाही, तर लांब पल्ल्याच्या गाड्यांचे आरक्षण देखील करता येणार आहे. जुन्या ॲपमधील तांत्रिक सुविधा १ मार्चपासून बंद होत असल्याने प्रवाशांनी नवीन ॲप डाऊनलोड करणे अनिवार्य ठरेल.

### २. बँकिंग आणि वढकव्यवहारांत सुरक्षेचा 'डबल डोस'

डिजिटल व्यवहारांना अधिक सुरक्षित करण्यासाठी १ मार्चपासून वढकच्या नियमात मोठी सुधारणा केली जात आहे. आता मोठी रक्कम ट्रान्सफर करताना केवळ पिन टाकून चालणार नाही, तर सुरक्षिततेचा अतिरिक्त स्तर म्हणून बायोमॅट्रिक व्हेरिफिकेशन (ठसा किंवा फेस आयडी) आणि एक्स्ट्रा ऑथेंटिकेशन पूर्ण करावे लागेल. यामुळे सायबर फसवणुकीला लगाम बसेल. बँकिंग क्षेत्रातील दुसरा मोठा बदल म्हणजे सरासरी मासिक शिल्लक मोजण्याची पद्धत. आता ही शिल्लक महिन्याच्या एकूण सरासरीवर गृहीत धरली जाणार असल्याने, ग्राहकांना दंडाचा फटका बसण्याची शक्यता कमी होईल आणि मोठा आर्थिक फायदा मिळेल.

### ३. व्हॉट्सॲप आणि टेलिग्रामसाठी 'सिम बाइंडिंग' अनिवार्य

सोशल मीडिया ॲप्सचा गैरवापर रोखण्यासाठी १ मार्चपासून व्हॉट्सॲप आणि टेलिग्रामसाठी 'सिम बाइंडिंग' हा कडक नियम लागू होत आहे. या नियमानुसार, तुमचे मेसेजिंग ॲप्स तुमच्या फोनमधील सक्रिय सिम कार्डशी जोडलेले असणे आवश्यक आहे. जर तुमच्या फोनमध्ये प्रत्यक्ष सिम कार्ड नसेल किंवा ते बंद असेल, तर तुम्ही त्या फोनवर व्हॉट्सॲप किंवा टेलिग्राम वापरू शकणार नाही. बनावट अकाऊंट्स आणि ओटीपी घोटाळ्यांना आळा घालण्यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

### ४. स्वयंपाकघराचे बजेट बदलणार?

दर महिन्याच्या पहिल्या तारखेप्रमाणे १ मार्च रोजी देखील इंधन कंपन्या गॅस सिलेंडरच्या किमती जाहीर करतील. व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरांमध्ये सातत्याने चढ-उतार होत असताना, सर्वसामान्यांचे लक्ष घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतींकडे लागले आहे. गेल्या काही महिन्यांपासून घरगुती गॅसचे दर स्थिर असले तरी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडींमुळे १ मार्चला यामध्ये किमती वाढणार की घटणार, हे स्पष्ट होईल. यामुळे गृहिणींच्या बजेटवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

### मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा आजपासून सुरू

मुंबई आणि कोकणातील विजयदुर्ग यांना जोडणारी बहुप्रतिक्षित रोल-ऑन/रोल-ऑफ फेरी सेवा अखेर १ मार्च २०२६ पासून सुरू होत आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ आणि ट2ट ऋी१ीी२ यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू होणारी ही सेवा कोकणातील जलवाहतुकीसाठी महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. या सेवेच्या माध्यमातून प्रवाशांना अवघ्या ६ ते ७ तासांत मुंबईहून विजयदुर्ग गाठता येणार आहे. सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी या सेवेचा शुभारंभ करत ट2ट ऋी१ीी२ संचलित फक्ष-फक्ष जहाजासाठी प्रतीकात्मकरीत्या पहिले तिकीट बुक केले. कोकणातील जलवाहतूक सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. यामुळे कोकणातील नागरिक आणि पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.


## आमच्या दाराशी हाय शिमग... शिमगो इलो, होय महाराजा!

## मुंबईहून २ दिवस सर्वाधिक एसटी बसेस कोकणासाठी रवाना होणार

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

फेब्रुवारी महिना संपताच होळीचे वेध लागतात. मुंबईसह सर्वच ठिकाणी होळीनिमित्त रंगांची उधळण जल्लोषात होत असताना कोकणातील शिमगोत्सव स्वतःचे वेगळेपण आजही जपत आहेत. उत्सवासाठी कोकणवासीयांची प्रवास गरज लक्षात घेता राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने यंदा १९८ जादा फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. महामुंबईतून आज, २८ फेब्रुवारी आणि उद्या, १ मार्चला सर्वाधिक गाड्या कोकणात रवाना होणार आहेत. 'शिमगो इलो... होय महाराजा' म्हणत कोकणवासी प्रवासासाठी सज्ज झाला आहे.

मुंबई, ठाणे, पालघर येथून कोकणासाठी होळी विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत.



२७ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत नियमित स्थानक आगारांतून विशेष गाड्या रवाना होणार आहेत. तसेच, समूह आरक्षणाच्या बसगाड्या थांब्यावरून धावणार आहेत.

सर्वाधिक फेऱ्यांचे नियोजन ठाणे आणि मुंबई विभागातून करण्यात आले आहे. ठाणे विभागातून ७९ फेऱ्या नियोजित असून, त्यापैकी ७१ फेऱ्यांचे आगाऊ आरक्षण फुल्ल झाले आहे. मुंबई विभागातून ६२ फेऱ्या नियोजित असून, ३७ फेऱ्यांचे आरक्षण फुल्ल झाले आहे. तर, २५ फेऱ्यांचे समूह आरक्षण आहे. पालघर विभागातून २४ फेऱ्या पूर्णपणे ग्रुप बुकिंगच्या माध्यमातून चालवल्या जाणार आहेत . रायगड विभागातून ३३ फेऱ्या उपलब्ध आहेत. २८ फेब्रुवारी रोजी तब्बल ९१ फेऱ्या आणि १ मार्च रोजी ५९ फेऱ्या कोकणात रवाना होणार आहेत.

एकूण १९८ फेऱ्यांपैकी १४१ फेऱ्या नियमित आरक्षणासाठी, तर ५७ फेऱ्या ग्रुप बुकिंगसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत १५०हून अधिक फेऱ्यांचे बुकिंग फुल्ल झाले आहे. एसटीच्या जादा फेऱ्यांच्या नियोजनामुळे प्रवाशांना काही अंशी दिलासा मिळणार आहे.

## वसई-विरारचा अर्थसंकल्प 'वेटिंग'वर!

■ **विरार। प्रतिनिधी,**

महापौर, उपमहापौर निवडणूक उशिरा होऊनही मुंबई महापालिकेचे स्थायी समिती सभापती तसेच विषय समित्यांचे सभापती निवडले गेले आहेत. विशेष म्हणजे मुंबईत स्वीकृत सदस्यांची निवडसुद्धा झाली असून, अर्थसंकल्पही सादर झालेला आहे. वसई-विरारमध्ये मात्र ही सर्व प्रक्रिया संथगतीने सुरू असून, स्थायी समिती सभापती नसल्याने यावर्षी अर्थसंकल्प सादर करण्यासाठी मार्च महिन्याचा मुहूर्त निघणार आहे.

वसई-विरार महापालिकेत स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड २० फेब्रुवारी रोजी महासभेत करण्यात आली आहे. आता याच सदस्यांमधून स्थायी समिती सभापती निवडले जाणार आहेत. यासाठी ५ मार्च रोजी सभापती निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लावण्यात आला आहे. पालिकेत बहुजन विकास आघाडीकडे स्थायी समितीत १० सदस्य असून, भाजपकडे ६ सदस्य आहेत. त्यामुळे सभापती पदावर बहुजन विकास आघाडीच्याच सदस्यांची वर्णी लागणार आहे. दरम्यान, महापालिकेचा वार्षिक अर्थसंकल्प आयुक्तांकडून स्थायी समिती सभापती यांना सादर केला जातो. मात्र वसई-विरार महापालिकेत स्थायी समितीचे सभापती अद्याप निवडले गेले नाहीत.त्यामुळे अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला नाही. ५ मार्च रोजी नवे सभापती निवडले जाणार असल्याने ६ मार्च रोजी अर्थसंकल्प सादर होणार असल्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे यावर्षीचा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या तुलनेत ७००/८०० कोटी



रुपयांनी कमी असण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात प्रशासकीय काळात सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प ३ हजार ९२६ कोटी रुपयांचा होता. मालमत्ता कर, पाणीपट्टी यामध्ये वाढ करण्यासह पाणीपुरवठा लाभ कर आणि मल सुविधा लाभ कर तसेच सिसी प्रमाणपत्र घेतलेल्या आणि ओसी प्रमाणपत्र न घेतलेल्या विकासकांकडून दंड म्हणून वसूल करणे अशा प्रकारे पालिकेचे उत्पन्न वाढविण्याची योजना प्रशासनाने आखली होती. मात्र उपरोक्त बाबींपैकी एकही निर्णय महापालिका प्रशासन घेऊ शकले नाही. त्यामुळे अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अवघ्या चार महिन्यातच सर्व विभागाचा खर्च ३० टक्क्याने कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजही उत्पन्न वाढीच्या दृष्टीने परिस्थिती "जैसे थे" अशीच असल्याने यावर्षीचा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या तुलनेत ७००/८०० कोटी रुपयांनी कमी असण्याची शक्यता आहे. स्थायी समिती सभापती निवडीनंतर म्हणजेच मार्च महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात अर्थसंकल्प सादर होण्याची शक्यता आहे.

### स्वीकृत सदस्य पदासाठी प्रतीक्षा :

महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेता या सर्वांच्या निवडीनंतर सर्वच महापालिकेत स्वीकृत सदस्य पदाची उत्सुकता असते. मुंबईसह काही महापालिकांमध्ये स्वीकृत सदस्य निवडल्या गेले आहेत. वसई-विरारमध्ये मात्र याबाबत सुद्धा प्रशासकीय स्तरावरून काहीही हालचाल झालेली नाही. सदस्य संख्याबळानुसार बहुजन विकास आघाडीचे सहा आणि भाजपचे चार सदस्य निवडले जाणार आहेत. यासाठी दोन्ही राजकीय पक्षांमध्ये चांगलीच स्पर्धा आहे. दरम्यान, परिवहन समिती, वृक्ष प्राधिकरण समिती, वैद्यकीय आरोग्य सहाय्य समिती या समित्यांचे गठन सुद्धा अद्याप झालेले नसून त्यांचे सभापती देखील निवडले गेलेले नाहीत. त्याचप्रमाणे नऊ झोन सभापतीची निवडदेखील करावी लागणार आहे. या प्रक्रियेकडे सुद्धा दोन्ही राजकीय पक्षांच्या नगरसेवकांचे लक्ष लागलेले आहे आणि प्रशासकीय स्तरावर मात्र याबाबत काहीही हालचाली नाहीत.

## खडकी देवळ्यातील यात्रेत बाळांना कळसावरून सोडण्याच्या प्रथेवर प्रश्नचिन्ह

■ **वसई। प्रतिनिधी,**

खडकी देवळा गावातील कानिफनाथ मंदिराच्या यात्रेत दरवर्षी हजारो भाविकांची गर्दी उसळते. भक्तीभाव, नवस आणि परंपरेचा उत्साह यामध्ये गावाचे वातावरण रंगते. मात्र या यात्रेशी संबंधित एक धक्कादायक प्रथा पुन्हा चर्चेत आली आहे.

लहान बाळांना मंदिराच्या उंच कळसावर नेऊन खाली उभ्या असलेल्या लोकांच्या चादरीत सोडण्याची पद्धत येथे अजूनही पाळली जात असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे बालकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. श्रद्धेच्या नावाखाली नेमके काय घडते, याबाबत आता विविध स्तरांतून चर्चा सुरू झाली आहे.

### श्रद्धा की अंधश्रद्धा?



#### संतापाची लाट आणि कारवाईची मागणी

ही परंपरा अनेक वर्षांपासून सुरू असल्याचे स्थानिक सांगतात. मात्र बदलत्या काळात अशा पद्धतींकडे नव्या दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. बालकांच्या जीवाशी खेळ करणारी कोणतीही कृती स्वीकारार्ह नसल्याची भावना समाजमाध्यमांवर उमटत आहे. मानवी हक्क अभियानचे कार्यकर्ते कल्याण टाकतोडे यांनी या प्रकारावर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मते, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे.

प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून या प्रथेला आळा घालावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. गावात आणि परिसरात याबाबत चर्चा रंगली असून, संबंधित विभागांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस पावले उचलली जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### यात्रेतील धोकादायक विधी

खडकी देवळा येथील कानिफनाथ मंदिर परिसरात भरत असलेल्या यात्रेत हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगितले जाते. दर्शनासाठी आलेल्या माहेरवाशिणी आणि कुटुंबीय चिमुल्यांना घेऊन मंदिरात येतात. नवस पूर्ण झाल्याच्या श्रद्धेतून काही पालक बाळला मंदिराच्या कळसावर नेतात. तेथून खाली उभ्या असलेल्या 4 व्यक्ती चादर ताणून उभ्या असतात आणि बाळाला त्या चादरीत सोडले जाते. काही सेकंदांचा हा प्रकार पाहताना उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकतो. कळसाची उंची, हातातील समन्वय आणि क्षणिक चूक यामुळे मोठा धोका संभवतो. चादर नीट ताणली गेली नाही, पकड सुटली किंवा तोल गेला तर गंभीर अपघात होऊ शकतो. त्यामुळे या प्रथेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

## ७ वर्षांचा खुशील अंगणात खेळत होता

## भटका कुत्रा चावल्याने जीव गेला, वाचवण्यासाठी आलेल्या मित्रालाही...

■ **कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याणजवळील मोहने-गाळेगाव परिसरात भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झालाय. दरम्यान, त्याला वाचवण्यासाठी धावलेल्या त्याच्या मित्रालाही भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासाबाबत पुन्हा एकदा संताप व्यक्त होत आहे. मृत मुलाचे नाव खुशील शंकर वाघे असे असून तो परिसरातील कातकरी पाड्यात आपल्या कुटुंबासोबत राहत होता.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, खुशील घराजवळ खेळत असताना एका भटक्या कुत्र्याने त्याच्यावर हल्ला करून चावा घेतला. त्याच्या आरडाओरडीनंतर त्याचा सात वर्षीय मित्र निलेश बागले त्याला वाचवण्यासाठी धावला. मात्र त्या कुत्र्याने निलेशलाही चावा घेतला. दोन्ही मुलांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान खुशीलचा मृत्यू झाला, तर निलेशवर कळवा



येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

खुशीलचे आई-वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या मुलाच्या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिकांच्या मते, या भागात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले असून वारंवार हल्ल्याच्या घटना घडत आहेत.

दरम्यान, कल्याण पूर्वेत अलीकडेच एका ३० वर्षीय बँक कर्मचाऱ्याने कुत्र्याने चावल्यानंतर रेबीजची भीती वाटून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. त्या पार्श्वभूमीवर ही घटना अधिकच गंभीर मानली जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) नगरसेविका तेजश्री गायकवाड आणि नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी या प्रकरणाची दखल घेत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) मुख्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेतली. बल्याणी चौक, उंभार्णी, मोहिली, गाळेगाव, जेतवननगर, तिपन्नानगर, आर. एस. टेकडी आणि मोहने परिसरात भटक्या कुत्र्यांचा त्रास वाढल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी विशेष पथक तैनात करावे, निर्बीजीकरण मोहीम आणि लसीकरण अधिक प्रभावीपणे राबवावे, अशी मागणी त्यांनी केली. महापालिका प्रशासनाच्या माहितीनुसार २०२४ ते २०२५ या कालावधीत २० हजार १९३ कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे. मात्र माहिती अधिकार कार्यकर्ते मनोज कुलकर्णी यांनी या प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप केला असून नव्या कंत्राटदारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नागरिकांनी आता तरी महापालिकेने ठोस उपाययोजना करून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

## 'मी तुमचं स्वप्न पूर्ण करु शकले नाही...' पोलिस भरतीतील अपयशाने तरुणीची आत्महत्या

■ **अंबरनाथ। प्रतिनिधी,**

सरकारी नोकरी मिळवण्याची स्पर्धा सध्या जीवघेणी झाली आहे. देशातील वाढती बेरोजगारी हे त्यामागचं कारण. या स्पर्धेत सर्वांनाच यश मिळेल असं नाही. ज्यांना यश मिळत नाही ते तरुण नैराश्यात बुडालेले असतात. यामुळे काही जणांनी टोकाचं पाऊल उचलल्याच्या घटना आपण वाचत, ऐकत असतो. अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे.



अंबरनाथ परिसरात राहणाऱ्या एका तरुणीने पोलिस दलात भरती होण्याचं स्वप्न पाहिलं होतं. आपल्या आई-वडिलांचं स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द तिनं उराशी बाळगली होती. मात्र सततच्या अपयशाला कंटाळून तिने आपले जीवन संपवले आहे. प्रतीक्षा राणे असं या २६ वर्षीय तरुणीचं नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### 'आई-बाबा मला माफ करा...'

घटनेची माहिती मिळताच अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा केला असता, त्यांना प्रतीक्षाने लिहिलेली एक सुसाईड नोट सापडली आहे. 'तुम्ही ज्या आयुष्याचं स्वप्न बघितलं होतं ते मी पूर्ण करुन शकले नाही, मला माफ करा,' असे भावनिक शब्द तिने या पत्रात लिहिले आहेत. आई-वडिलांना चांगले जीवन देण्याचे स्वप्न भंगल्याच्या दुःखातून तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

#### राहत्या घरात आढळला मृतदेह

अंबरनाथ (पश्चिम) येथील स्वामीनगर भागात प्रतीक्षा राणे आपल्या कुटुंबासह राहत होती. गेल्या अनेक वर्षांपासून ती पोलीस भरतीसाठी प्रयत्न करत होती. मात्र, वारंवार प्रयत्न करूनही यश मिळत नसल्याने ती नैराश्यात होती. २६ फेब्रुवारी रोजी प्रतीक्षाचा मृतदेह तिच्या राहत्या घरात आढळून आला.

#### पोलीस तपास काय सांगतो?

अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सैयद शब्बीर यांनी दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृतदेह पोस्ट मार्टमसाठी पाठवण्यात आला असून, पोलीस प्रतीक्षाच्या कुटुंबीयांची आणि शेजाऱ्यांची चौकशी करत आहेत. दरम्यान, स्पर्धा परीक्षांचा दबाव आणि त्यातून येणारे अपयश सध्याच्या तरुणाईसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

## पत्नीच्या व्हॉट्सॲप स्टेटसवर अश्लिल कमेंट... जाब विचारायला गेलेल्या पतीची हत्या

### नेमकं प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, नालासोपारा पूर्व येथील प्रगती नगर भागात आफताब शेख (वय २४) हा तरुण त्याची पत्नी शबाना शेख (२२) हिच्यासोबत राहत होता. शुक्रवारी या दाम्पत्याच्या लग्नाचा वाढदिवस होता. या खास दिनानिमित्त शबाना हिने आपल्या व्हॉट्सॲपवर एक स्टेटस ठेवले होते. हे स्टेटस पाहून मेहंदी हसन शेख (२) या तरुणाने त्यावर अत्यंत आक्षेपार्ह आणि अश्लील कमेंट केली. केवळ स्टेटसवर कमेंट करून मेहंदी थांबला नाही, तर त्याने इंस्टाग्रामवरही शबानाला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. आपल्या पत्नीबद्दल असे घाणेरडे शब्द वापरल्याचे समजताच आफताब संतापला. या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी आफताब आणि शबाना शुक्रवारी पहाटे साडेचारच्या सुमारास नालासोपारा पश्चिम येथील हनुमान नगर परिसरात असलेल्या मेहंदी हसनच्या घरी पोहोचले.

■ **नालासोपारा। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. आपल्या पत्नीच्या व्हॉट्सॲप स्टेटसवर अश्लील कमेंट करणाऱ्या तरुणाला जाब विचारण्यासाठी गेलेल्या २४ वर्षीय पतीची चाकूने वार करून हत्या करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ज्या दिवशी ही घटना घडली, त्याच दिवशी



या दाम्पत्याचा लग्नाचा वाढदिवस होता. आनंदाच्या दिवशीच पतीचा असा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

#### वाद विकोपाला गेला आणि रक्ताचा सडा पडला

सुरुवातीला दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. मात्र, रागाच्या भरात असलेल्या मेहंदी हसनने अचानक चाकू बाहेर काढला आणि आफताबवर एकामागून एक अनेक वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की, आफताब रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. लग्नाच्या वाढदिवसाच्या पहाटेच शबानासमोर तिच्या पतीची निर्घृण हत्या झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## 'मुंबई'ला बनवण्याचे जागतिक दर्जाचे शहर



**मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.**

मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल. मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वर्षासाठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. 'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे. शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वर्षासाठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खचार्साठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन-चार वर्षांत रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील वर्षी या सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च २ लाख ३३ हजार कोटी रुपये एवढा होता. त्यामुळे एका वर्षात ११ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेचा महसुली वाढीसाठी सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच विकासकामाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बॉंड्स काढण्याची कार्यवाही करणार आहे. मुंबई शहरात रेल्वे स्थानके, रुग्णालये, शाळा आणि अरुंद पदपथांजवळच्या परिसरात फेरीवाल्यांचे बस्तान बसलेले जागोजागी दिसते. महापालिकेने फेरीवाल्यांचा त्रास कमी करण्यासाठी आणि अधिकृत विक्रेत्यांची ओळख पटवण्यासाठी अर्थसंकल्पात क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली, त्याचे स्वागत करायला हवे. मुंबईत सुमारे १ लाख फेरीवाले असले तरी सर्वेक्षणात केवळ १५ हजार फेरीवाले पात्र आढळले आहेत. आता या पात्र फेरीवाल्यांनाच आता क्यूआर कोड असलेले डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार असल्याने अधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले ओळखणे सोपे होणार आहे. प्रशासनाकडून यापुढे अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई झाल्यास मुंबईकरांना रस्त्यांवरून चालताना मोकळा श्वास घेता येईल.

## घेरण्याकरिता विरोधी पक्षनेतेपदच का हवे?

आपली लोकशाही कोणत्या पद्धतीची असावी अशी चर्चा स्वातंत्र्यानंतर सुरू झाली तेव्हा दोन पर्याय होते - लोकशाही थेट निर्णयाद्वारे चालविली जावी की संवाद प्रक्रियेद्वारे?

थेट निर्णयाद्वारे म्हणजे ज्यांना सरकार चालविण्याचा अधिकार मिळतो त्यांनी थेट निर्णय घ्यायचे व अंमलात आणायचे. ती अध्यक्षीय पद्धत. आपण संवाद प्रक्रियेद्वारे म्हणजे संसद वा विधिमंडळात निर्णयांची चिकित्सा व कायदे केल्यानंतर अंमलबजावणी करण्याचा दुसरा पर्याय स्वीकारलेला आहे. संसद किंवा विधिमंडळाला सर्वोच्च महत्त्व असल्याने प्रत्येक सरकारला वषार्तून किमान तीनवेळा त्यांच्यासमोर जावे लागते. आपल्या योजना सादर करून निर्णयांना तिथे मान्यता घ्यावी लागते.

सरकारला पै ना पै खर्च करण्यासाठी संसद अथवा विधिमंडळाची मान्यता घ्यावी लागते. त्यासाठी वार्षिक अंदाजपत्रक म्हणजेच बजेट मांडून सभागृहाची मान्यता घ्यावी लागते. बजेटमध्ये आपण प्रतिनिधित्व करत असलेल्या भागाला अथवा जनहिताच्या एखाद्या गोष्टीला निधी मिळाला नाही, असे कोणत्याही सदस्याला वाटले तर तो एक रुपयाची कपात सूचना देऊन संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधून घेऊ शकतो. त्यापासून त्याला कोणीही रोखू शकत नाही. याचाच आधार घेत सत्तेपासून प्रदीर्घ काळ वंचित राहूनसुद्धा प्रजा समाजवादी पक्ष, जनता पक्ष पुढे जनता दल, डावे पक्ष, शेका पक्ष, अन्य प्रादेशिक पक्षाचे सदस्य वषार्नुवर्षे निवडून येत राहिले. जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

संसद वा विधिमंडळ याचे अधिकार इतके मोठे आहेत की तिथे झालेल्या निर्णयांना आणि चचेर्ला कुठेही आव्हान देता येत नाही. तेथील चचेर्चा आधार न्यायालये पण घेऊ शकत नाहीत. संसद अथवा विधिमंडळ सदस्याला तिथे उपस्थित राहण्यापासून, जनहिताचे विषय उपस्थित करण्यापासून कोणी वंचित ठेवू शकत नाही.

सांगण्याचा उद्देश हा की, सद्यस्थितीची तुलना सर्वांना करता यावी. घटनाकारांनी फार विचार करून संसदीय लोकशाहीचे स्वरूप स्वीकारले आहे. त्यात दोष आहेत आणि आम्ही हतबल आहोत असे कोणी म्हणत असेल तर ती त्यांची कमतरता आहे. तसेच लोकशाहीचा रथ एका चाकावर चालूच शकत नाही. विरोधी पक्ष कितीही लहान असला तरी त्याचे महत्त्व आहे आणि ते जपण्याची जबाबदारी सत्तापक्षाची आहे. कारण विरोधी पक्ष कोणी एक विशिष्ट अशी व्यक्ती नाही. तर ती जनभावना आहे. लोकांनी जाणीवपूर्वक त्यांना मते दिली आहेत. विरोधी पक्षाची कोंडी करणे म्हणजे जनभावनेची कोंडी करणे हा साधा सरळ अर्थ आहे. ती फार काळ केली तर कोंडलेली वाफ कुठून ना कुठून बाहेर पडणारच.

आता विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले आहे. त्याची सुरुवातच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेते पद रिक्त आहे या राग आळवणीने झाली आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते पद मिळावे म्हणून शिवसेना- उद्धव बाळासाहेब ठाकरे हा पक्ष प्रयत्न करून थकतो आहे. आज ना उद्या हे पद मिळेल असे त्यांना वाटते. पण मध्येच विधान परिषदेत विरोधी पक्षनेते पद रिक्त झाले तेव्हा तिथे काँग्रेसचा नेता बसेल, अशी शक्यता असताना त्यांच्या एका सदस्याने राजीनामा देत खो घातला. याचा अर्थ दोन्ही सभागृहांना हे पद मिळणार नाही हे स्पष्ट झाले.

हे पद मिळाले म्हणजेच आपल्या कामाला परिपूर्णता येईल असे विरोधी पक्षाने मानण्याचे काही कारण नाही. असे पद नसतानाही लक्षणीय कामगिरी करता येते. पण त्यासाठी जबर इच्छाशक्ती आणि संयम हवा. लोकांना सरकार कसे काम करतेय आणि त्यातील उणिवा विरोधी पक्ष कसा मांडतोय याची प्रचंड उत्सुकता असते.

सर्वसामान्यांमधील नवीन पिढी विधिमंडळ कामकाजाकडे फार औत्सुक्याने पाहत असेल असे ठामपणे म्हणता येत नाही. त्यांच्या मनातल्या प्रश्नांना इथे वाचा फुटतेय का यावर ते अवलंबून आहे. तरूण पिढीच्या ज्या ज्या समस्या आहेत त्यावर चर्चा झाली तर त्यांचे लक्ष वेधले जाईल. तीच गत मध्यमवर्गीयांची आहे.



आज संपर्काची अनेक उत्तम साधने उपलब्ध आहेत. पूर्वी केवळ वर्तमानपत्र आणि आकाशवाणी याद्वारेच विधिमंडळ कामकाजाबाबत माहिती मिळत असे तेव्हा याकडे लोक कान टवकारून असत. सध्यांकाळी ७ च्या बातम्या संपल्यानंतर विधिमंडळ कामकाजाचे समालोचन अत्यंत बारकाईने ऐकले जाई. आज समाजमाध्यमांद्वारे माहितीचा भडीमार आहे. पण त्यातून लोकांपुढे विधिमंडळाचे नेमके काय चित्र जाते?

या प्रश्नाचे उत्तर मागील पावसाळी अधिवेशनाच्या शेवटी विधान भवनात दोन कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या झटापटीतून मिळाले. आपापल्या नेत्यासाठी लढणारे दोघेजण एकामेकांवर धावून गेले आणि या महत्त्वाच्या वास्तूची अत्यंत नकारात्मक प्रतिमा लोकांपुढे गेली. याचे कारण तपासले असता काय दिसून येते तर आजकाल विधान भवन वास्तूत प्रवेश करताना आपले फोटो काढणे व ते समाजमाध्यमांवर टाकणे हा एक छंद झाला आहे. आपण अधिवेशन चालू असताना तिथे आहोत हे गावच्या लोकांना, मित्रांना दाखविणे हा फुशारकीचा भाग झाला आहे.

मारामारीचा परिणाम असा झाला की, विधान भवनात प्रवेश करण्यासाठी सर्रास उपलब्ध असलेल्या प्रवेशिका बंद झाल्या. इथे प्रवेश मिळविणे एवढे सोपे राहिलेले नाही. काहींना ते अजूनही सोपे आहे असे अपवाद दिसतात. पूर्वी विधान भवनात सामान्य लोक येत होते, पण त्यांचे लक्ष या वास्तूत इतरत्र भटकत राहण्यात नसे.


विधानसभा आणि विधान परिषद सभागृहांच्या प्रेक्षक गॅलरी खच्चून भरलेल्या असत. आपण ज्या नेत्यांच्या तडाखेंबद भाषणांची, वक्तृत्व कौशल्याची वर्णने वर्तमानपत्रांतून वाचतो, ऐकतो ते सभागृहात कसे विषय मांडतात यासाठी लोक बसून राहत. अनेकदा आत बराचवेळ बसलेल्यांना बाहेर जाण्याची व इतरांनाही सभागृहाचे कामकाज पाहू द्या अशी सूचना करावी लागे. आज काय चित्र आहे?

विधान भवनातील प्रवेशमार्गावर टाकलेल्या रेड कार्पेटवर व पोर्चमध्ये उभे राहून आमदार, मंत्री व इतर नेत्यांच्या बाजूला उभे राहून फोटो काढणे याकडे अधिक लक्ष दिले जात आहे. तुम्ही आत का बसत नाही असे विचारल्यावर काहींचे म्हणणे असते की तशा चर्चा तरी व्हायला हव्या. विरोधी पक्ष अभ्यासपूर्ण भाषणांनी सरकार पक्षाची कोंडी करतोय, सरकारला बचावात्मक भूमिका घ्यायला भाग पाडतोय, मंत्री व सत्ताधारी बाकावरील सदस्य सरकारची बाजू भक्कमपणे मांडताहेत असे दिसायला हवे. यावर काय उत्तर देणार?

मागे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना मागास भागांच्या अनुशेषाच्या मुद्द्यावरून विधान परिषदेत भाजपासह बी. टी. देशमुख यांच्यासारख्या सदस्यांनी सरकारची अशी काही कोंडी केली की अधिवेशनाचा कालावधी वाढवावा लागला. राज्याच्या महाधिवक्त्यांना (एडव्होकेट जनरल) सभागृहासमोर अभिमत देण्यासाठी पाचारण करावे लागले. त्याचवेळी विधिमंडळ कामकाज संपणार आहे तेव्हा लवकर निघू म्हणून संसदीय कामकाज मंत्री पुण्याला निघून गेले होते. त्यांना हे खाते गमवावे लागले होते.

लोकशाहीतले विधिमंडळाचे महत्त्व काय याचे असंख्य दाखले आहेत. त्याचे महत्त्व आणि पावित्र्य जपणे सर्व सदस्यांच्या हातात आहे. विधिमंडळात कोणीही हतबल असू शकत नाही. तसे म्हणणे म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिलेल्या व लोकशाही पद्धती स्वीकारून तशी राज्यघटना देणारांचा तो उपमर्द ठरेल.

## दिबांच्या नावाची कुणाला ॲलर्जी?



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्र सरकार यांची नक्की अडचण काय आहे हेच समजत नाही. ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल, अशी ग्वाही लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीला दिली. काही तांत्रिक अडचणींमुळे याला तीन महिने लागतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. आता तीन महिने झालेच शिवाय त्यावर आणखी दोन महिने झालेत, तरीही केंद्र सरकार विमानतळाचे नामांतर करायला तयार नाही. यामुळे नवी मुंबईसह ठाणे, रायगड आणि मुंबईतील आगरी समाज संतप्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर २३ फेब्रुवारी रोजी कृती समितीने मुंबईच्या आझाद मैदानात लक्षवेधी धरणे आंदोलन करत सरकारला इशारा दिला आहे. या आंदोलनाची ना सरकारने दखल घेतली ना माध्यमांनी, हीच गंभीर बाब आहे. वास्तविक नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी दशकभरापासून होत आहे. मात्र, त्याकडे कुणी गांभीयार्ने पाहात नव्हते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव विमानतळाला देण्याचे प्रयत्न होते. मात्र, लोकमागणीमुळे त्यांनीही सरकार जाता जाता दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. ही घटना जून २०२२ मधील. तेव्हापासून पावणेचार वर्षे भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीचे सरकार आहे. मग दिबांच्या नावाचे गाडे अडले कुठे, असा सवाल विचारला जात आहे.

राज्यात आणि केंद्रात एकच सरकार असून पावणेचार वर्षे दिबांच्या नावाच्या प्रस्तावाचा विचार केला जात नसेल तर या सरकारला कोणत्या अर्थाने गतिशील सरकार म्हणायचे? आझाद मैदानावरील धरणे आंदोलनात सर्वपक्षीय कृती समितीने सरकारला एक आठवड्याची मुदत दिली आहे. तोपर्यंत सरकारने विमानतळाचे नामकरण न केल्यास हातात दगड घेऊन लाखोंच्या संख्येने मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. या निमित्ताने दिबांचेच नाव विमानतळाला हवे, या मागणीवर कृती समिती आग्रही असल्याचे स्पष्ट झाले. लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी सर्वपक्षीय कृती समितीने वारंवार सरकारशी संवाद साधला, अगदी दिल्लीपर्यंत धडक दिली. अशातच ८ ऑक्टोबर २०२५ रोजी विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचा घाट घालण्यात आला. अशावेळी आगरी-कोळी, ओबीसी आणि महाराष्ट्रातील दिबाप्रेमी समाजाला शांत करण्यासाठी तसेच उद्घाटन सोहळा कोणत्याही निषेधाशिवाय पार पडावा यासाठी मुख्यमंत्री फडणवीसांनी 3 ऑक्टोबर रोजी कृती समितीची बैठक बोलावली होती. विमानतळाचे उद्घाटन होऊ द्या, त्यानंतर तांत्रिक अडचणी दूर करून तीन महिन्यांत विमानतळाचे नामांतर करू, असे मुखमंत्र्यांनी या बैठकीत स्पष्ट केले होते. तीन महिने झाल्यानंतर सरकारला स्मृतीभ्रंश झालेला पाहून भिवंडीचे खासदार सुरेश ऊर्फ बाळ्यामामा म्हात्रे मैदानात उतरले. त्यांनी २२ डिसेंबरपासून भिवंडीतील माणकोली नाका ते नवी मुंबई विमानतळ या पदयात्रा आंदोलनाचा इशारा २ डिसेंबर २०२५ रोजी दिला होता. ही पदयात्रा २४ डिसेंबर रोजी विमानतळावर धडकणार होती. यात अंदाजे लाखभर भूमिपुत्र सहभागी होतील, असा अंदाज होता. याची जोरदार तयारीही सुरू करण्यात आली होती. मात्र, राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकांची घोषणा झाल्यामुळे लागू झालेल्या आचारसंहितेमुळे पोलिसांनी खासदार बाळ्यामामांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली. त्यामुळे डिसेंबरमध्ये होणारा उद्रेक टळला.

आता सर्वांनी राजकीय मतभेद बाजूला सारून दिबांच्या नावासाठी थेट मंत्रालयावर मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे. वास्तविक ८ ऑक्टोबर रोजी उद्घाटन झाल्यानंतर २५ डिसेंबर २०२५ पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यरत झाले. त्यामुळे २५ डिसेंबरपासून लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळावर तुमचं स्वागत आहे, अशी घोषणा ऐकायला मिळेल, अशी अपेक्षा होती, ती फोल ठरली. त्यानंतरही दोन महिने गेले तरी सरकार दिबांचे नाव विमानतळाला देण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे आता कृती समितीचा सरकारवर विश्वास राहिलेला नाही. इतर वेळी रात्रीत जीआर काढले जातात, रात्री ८ वाजता निर्णय जाहीर केले जातात. मात्र, दिबांचे नाव देण्याची वेळ आल्यानंतर पावणेचार वर्षे सरकार सुस्त असते. म्हणूनच सरकारला दिबांच्या नावाची ॲलर्जी आहे का, असा संतप्त सवाल दिबाप्रेमी करत आहेत. दिबांचा स्वातंत्र्याच्या लढाईत म्हणजे १९४२ च्या चळवळीत सहभाग होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांचे योगदान होते. ते पाच वेळा आमदार आणि एकदा खासदार होते. महाराष्ट्रातल्या धरणग्रस्तांसाठी त्यांनी विधिमंडळात उठवलेला आवाज खूप महत्त्वाचा होता. साडेबारा टक्के योजनेचा जन्म दिबांमुळेच झाला. शेतकरी, आदिवासी, महिलांच्या प्रश्नांसाठी विधिमंडळात वेळोवेळी आवाज उठवला. एवढे असूनही त्यांची राहणी अत्यंत साधी होती. दीनदुबळ्यांसाठी लढर्णाया या लोकनेत्याच्या मृत्यूनंतर १३ वर्षांनंतरही त्यांचा सन्मान होणार नसेल तर सरकारचा करावा तितका निषेध थोडाच आहे.

## देशाचे 'गलगोटिया'करण थांबलेच पाहिजे

एआय समिटमधील गलगोटिया गोंधळ ही केवळ एका कार्यक्रमाची चर्चा नाही; ती शासन-व्यवस्थेच्या गुणवत्ता-मानकांची परीक्षा आहे. विकासाचे मॉडेल केवळ घोषणांनी किंवा दृश्य-प्रस्तुतीने सिद्ध होत नाही. ते सिद्ध होते काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाने.



देशात २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी प्रचंड प्रमाणात जाहिरातबाजी आणि इव्हेंट करून कार्यक्षम प्रशासन, वेगवान निर्णयप्रक्रिया आणि उद्योगनिष्ठ धोरणांचे उदाहरण म्हणून गुजरात मॉडेलची प्रसिद्धी करत जनतेची दिशाभूल करून सत्ता मिळवली. त्यानंतर 'काम कमी जाहिराती जास्त'वाले गुजरात मॉडेल संपूर्ण देशावर लादले. गेल्या अकरा वर्षांत वारेमाप घोषणा, मोठमोठे इव्हेंट, पेट्रोल पंपपासून कोविड लसीच्या प्रमाणपत्रापर्यंत सगळीकडे पंतप्रधानांचे फोटो. कोरोनाच्या संकटकाळात रुग्णांना बेड आणि ऑक्सिजन उपलब्ध करून देण्याऐवजी मोबाईल टॉर्च पेटवा आणि टाळ्या-थाळ्या वाजवायला लावण्याचे उद्योग केले. त्यासाठी प्रचंड मोठी प्रचारयंत्रणा राबवून स्वतःची पाठ थोपटून घेतली.

या संकटकाळात पीएमकेअर फंड नावाने एक खासगी संस्था उघडून सरकारी म्हणून तिचा प्रचार करत सत्तेचा वापर करून शेकडो, हजारो कोटी रुपये जमा केले. त्यांचे पुढे काय झाले याची माहिती ना संसदेत दिली जाते, ना माहिती अधिकार कायद्याखाली. सत्तेच्या जोरावर बेफामपणे वागायचे, माध्यमांच्या मदतीने जनतेपासून सत्य लपवायचे आणि आभासी चित्र निर्माण करायचे. जनतेला स्वप्नं दाखवत दिशाभूल करत राहायचे ही सरकारची कार्यपद्धती आहे. त्यामुळे सत्तेच्या जवळच्या व्यक्ती आणि संस्थांनीही आपल्या फायद्यासाठी याच कार्यपद्धतीचा अवलंब केला. सरकारी मीडिया आणि प्रचारतंत्राच्या मदतीने तो अनेकदा यशस्वीही झाला. त्यामुळे सरकारसोबतच प्रशासन, व्यक्ती आणि संस्थांनाही या बोगसगिरीची चटक लागली आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये गलगोटियास नामक खासगी विद्यापीठाने अशाच प्रकारे केलेली बोगसगिरी उघड झाल्याने गेल्या काही वर्षांत देशाचा प्रवास गुजरात मॉडेलपासून गलगोटिया सरकारपर्यंत आल्याचे स्पष्ट झाले.

### जागतिक परिषद

केंद्र सरकारने दिल्लीच्या 'भारत मंडपम्'मध्ये पाच दिवसीय एआय इम्पॅक्ट समिट (कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद) चे आयोजन केले होते. जगभरातील जवळपास पन्नासहून अधिक देश, गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचई, ओपन एआयचे सॅम ऑल्टमन यांच्यासारखे टेक कंपन्यांचे दिग्गज सहभागी झाले होते. पंतप्रधानांच्या हस्ते या शिखर परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. जगभरातील कंपन्या, तंत्रज्ञ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात केलेली संशोधने, तयार केलेली उपकरणे आणि तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करणारी शेकडो दालने या परिषदेत होती. अनेक भारतीय कंपन्या आणि तंत्रज्ञ यांना या परिषदेच्या माध्यमातून त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान जगासमोर मांडण्याची संधी मिळाली. अनेक कंपन्या, स्टार्टअप्सनी या संधीचे सोने केले. पण अशा जागतिक पातळीवरच्या शिखर परिषदेचे आयोजक असणाऱ्या केंद्र सरकारने गुणवत्तेपेक्षा सरकारच्या जवळच्या असणाऱ्या गलगोटियासारख्या सुमार दर्जाच्या, बोगसगिरी करणाऱ्या गलगोटिया नामक विद्यापीठाला दालन उपलब्ध करून दिले. या दालनात त्यांनी चीनने तयार केलेला रोबो कुत्रा प्रदर्शनात ठेवला. जगभरातून आलेल्या प्रतिनिधींसमोर वृत्तवाहिन्यांना मुलाखती देऊन रोबोट कुत्रा आणि ड्रोन उपकरणे विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये विकसित केल्याचे खोटे सांगितले. पण चिनी सोशल मीडिया हँडल्स आणि माध्यमांनी हा खोटारडेपणा उघडा पाडला. देशाची राष्ट्रीय वृत्तवाहिनी डीडीन्यूजला या संदभार्तील बातम्यांचे व्हिडीओ डिलीट करावे लागले. गलगोटियांच्या बोगसगिरीमुळे जगभरात देशाची नाचक्की झाली.

### गलगोटियांचे कारनामे

चांगले शिक्षण, संस्कार देऊन प्रज्ञावंतांची पिढी घडविण्याऐवजी भाजप आणि संघपरिवाराशी निगडित वरिष्ठ नेत्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे. विविध सरकारी उपक्रमांशी स्वतःची भूमिका संलग्न असल्याचे जाहीर प्रदर्शन करून सरकारी लाभ मिळवणे. हा गलगोटिया विद्यापीठाशी संबंधित लोकांचा खरा उद्योग असल्याची सार्वत्रिक चर्चा उत्तर प्रदेश आणि दिल्लीच्या परिसरात आपणास ऐकायला मिळते. देशात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू केल्यानंतर त्याच्या संपूर्ण अंमलबजावणीची घोषणा करणाऱ्या पहिल्या विद्यापीठांपैकी एक गलगोटिया होते. संस्थापकांनीच विद्यापीठ नरेंद्र मोदींच्या विश्वगुरूच्या संकल्पनेवर वाटचाल करत असल्याचे म्हटले आहे. त्यांनी केलेले दावे आणि वास्तविकता यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. गलगोटिया विद्यापीठाने केवळ सात वर्षांत तब्बल २,४३० पेटंट्स दाखल केल्याचा दावा केला. आयआयटी मद्राससारख्या देशातील प्रतिष्ठित सरकारी संशोधन संस्थेने १९७५ पासूनच्या सुमारे ५० वर्षांत २,५५० पेटंट्स दाखल केल्याची नोंद आहे. त्यामुळे हे विद्यापीठ फक्त खोटारडेपणातच विश्वगुरू आहे का? असा प्रश्न पडतो.

### प्रणालीगत पडताळणीची कमतरता?

जागतिक पातळीवरील शिखर परिषद आयोजित करताना त्यात कोणाला सहभागी करून घ्यायचे. कोणत्या संस्था आणि व्यक्तींना दालने उपलब्ध करून द्यायची याची सखोल पडताळणी करणे आवश्यक असते. त्याचे इडट म्हणजे उत्पादन तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व घटकांची संरचित यादी तपासली पाहिजे, ज्यात साधारणपणे घटकाचे नाव, पार्ट नंबर, साहित्याचा प्रकार, पुरवठादार, किंमत, स्तररचना, डिझाइन ओरिजिनॅलिटी तपासणी, आयात केलेल्या घटकांपासून जोडणी करून तयार केलेले उत्पादन आहे की स्वतःच्या संस्थेमध्ये डिझाइन व निर्मिती केलेले, प्रत्यक्ष कार्यक्षमतेचे स्वतंत्र परीक्षण ही सर्व पडताळणी करणे अपेक्षित होते. पण गलगोटियांच्या सरकारशी असणाऱ्या जवळिकीमुळे प्रशासनाने या बाबींची पडताळणी केली नसावी असे वाटते. त्यामुळे गलगोटियांइतकेच आयोजक म्हणून सरकारही जबाबदार आहे.

### प्रतिमा-व्यवस्थापन की तांत्रिक गांभीर्य?

कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी विशेष संरक्षक गटाकडून रढऋ कडून स्थळाचा ताबा घेणे ही नियमित सुरक्षा प्रक्रिया आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्येही पंतप्रधानांच्या आगमनापासून निर्गमनापर्यंतच्या कार्यकाळात दालने रिकामी करण्यात आली. सहभागी संस्थांच्या प्रतिनिधींना यावेळी बाहेर काढण्यात आले. काही जणांना परत आल्यावर आपल्या दालनातील उपकरणे गायब झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट करून आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. सुरक्षा कारणास्तव स्टॉल्स रिकामे करणे, सादरीकरण थांबवणे किंवा कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात अडथळे येणे यांसारख्या घटना घडल्याच्या तक्रारी पुढे आल्या. तंत्रज्ञान प्रदर्शनाचा उद्देश नवकल्पनांचा मुक्त आणि पारदर्शक आदानप्रदान असतो; केवळ दृश्य-प्रस्तुती नव्हे.

### खासगी विद्यापीठे आणि उत्तरदायित्व

अलीकडच्या काळात "सेंटर ऑफ एक्सलन्स" या संकल्पनेखाली अनेक खासगी विद्यापीठे मोठे दावे करतात. मात्र संशोधन-प्रामाणिकता, डेटा-पारदर्शकता आणि स्वतंत्र ऑडिट यांची स्पष्ट यंत्रणा नसल्याने हे दावे प्रश्नांकित ठरताहेत. संशोधन दाव्यांचे स्वतंत्र मूल्यांकन कोण करते? सरकारी मंचावर सहभागी होण्यासाठी गुणवत्ता-मानके किती कठोर आहेत? विद्यार्थ्यांच्या नावावर सादर केलेल्या प्रकल्पांचे तांत्रिक स्वामित्व आणि जबाबदारी कोणाची? हे प्रश्न केवळ एका संस्थेपुरते मर्यादित नाहीत; ते भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडलेले आहेत.

एआय समिटमधील गलगोटिया गोंधळ ही केवळ एका कार्यक्रमाची चर्चा नाही; ती शासन-व्यवस्थेच्या गुणवत्ता-मानकांची परीक्षा आहे. विकासाचे मॉडेल केवळ घोषणांनी किंवा दृश्य-प्रस्तुतीने सिद्ध होत नाही. ते सिद्ध होते काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाने. पण दुदैर्वाने विद्यमान सरकारकडे याची मोठी कमतरता आहे. गलगोटियाच्या भंपकगिरीविरोधात युवक काँग्रेसने आंदोलन केले. त्यावरून भाजपने अर्धनग्नपणे आंदोलन केले, अशी टीका करत देशभरात काँग्रेस कार्यालयासमोर आंदोलन केले. पण याच भाजप सरकारच्या कार्यकाळात मणिपूरमध्ये भगिनीची नग्न धिंड काढून अत्याचार करण्यात आले. याची त्यांना लाज वाटली नाही. याबाबत त्यांनी तोंडातून 'ब्र' काढला नाही, आंदोलन केले नाही. देशाचे गेल्या काही वर्षांपासून गलगोटियाकरण सुरू आहे. ते थांबवले नाही तर भविष्य अंधःकारमय असेल हे आर्टिफिशियल इंटेलिजेन्ससुद्धा सांगेल.

# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...





**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्र, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्र, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय

पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो. लागणारे साहित्य

▮ कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त



**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो. फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्कात्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात. भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के.के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात. कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल



**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.


जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये. वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे. नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.

# दातांच्या समस्येने देखील कर्करोग होण्याची शक्यता

**कर्करोग (कॅन्सर)** होण्याचे नवे कारण सध्या समोर आले आहे. देशातील कित्येक लोकांना दात साफ न केल्यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर) झाल्याचे समोर आले आहे. अशी दिरंगाई करणाऱ्याा लोकांच्या संख्येत ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे लोक कोणत्याही प्रकारच्या तंबाखूचे सेवन करत नाहीत, त्यांना सुद्धा कर्करोग (कॅन्सर) होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या दातांच्या फटी योग्यरीत्या साफ न केल्यामुळे हा गंभीर त्रास उद्भवण्याची शक्यता आहे. अन्नाचे कण दातांमध्ये अडकतात आणि त्यानंतर ते कण कुजतात. कुजलेल्या कणांमुळे सुद्धा कर्करोग होऊ शकतो. मागील सहा वर्षांमध्ये भारतात ओठ आणि तोंडाचा कर्करोग असणाऱ्याा रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या परिस्थितीला रोखण्यासाठी खराब दातांची स्वच्छता, तुटलेले दात याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

## काही उपाय

- तंबाखू खाणे टाळा. जर तंबाखू खात असाल तर वेळीच खाणे बंद करा.
- मद्याचे सेवन प्रमाणात करा.
- उन्हामध्ये फार काळ राहणे टाळा. उन्हात जाण्याआधी लिपबामचा वापर करा.
- फास्ट फूड खाणे टाळा किंवा प्रमाणात खा. आहात ताज्या फळांचा वापर करा.
- सतत तंबाखूची तल्लफ येत असल्यास, पायऱ्यांवरून चढ-उतार करा.



# वर्किंग वुमन्सने आहारात 'या' पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे



**स्त्रियांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घेयला हवी कारण की त्यांना ऑफिस आणि घरात दोन्हीकडे लक्ष द्यावं लागतं. स्त्रिया सर्वांच लक्ष ठेवण्याच्या नादात स्वतःची काळजी घेत नाही. म्हणून वर्किंग वूमन्सला आपल्या आहारात पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे. येथे प्रस्तुत आहे वर्किंग वूमन्ससाठी डायट चार्टः**

**ब्रेकफास्ट :** वर्किंग वुमन्सने ब्रेकफास्ट स्किप करायला नको. घरातून निघण्याआधी आपण दूध, सांजा, कॉर्नफ्लेक्स किंवा सँडविच घ्या. सकाळच्या नाश्त्यात व्हिॅमिन ए युक्त फळे जशी शेवफळ, पपई आणि स्ट्रॉबेरी खाणे फायदेशीर ठरेल. याबरोबरच थोडेसे ड्रायफ्रुट्स आपल्याजवळ ठेवावे.

**लंच :** वर्किंग वुमन्सच्या ब्रेकफास्ट आणि लंच यात चार ते पाच तासांचा अंतर हवे. लंचमध्ये भाजी, डाळ, दही, भात आणि पोळीचा समावेश करा. हिरव्या भाज्या जसे ब्रोकोली, पालक, मेथी व इतर आहारात सामील करा. लंचमध्ये सॅलड किंवा कोशिंबीर घ्या.

**स्नॅक्स :** ऑफिसमध्ये काम करणारे काही लोक संध्याकाळी भूक लागल्यावर काही अनहेल्थी फूड खातात, जे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. संध्याकाळी भूक लागल्यावर फळे किंवा कडधान्य खाणे फायद्याचे ठरेल. याने भूकही भागेल आणि आरोग्यासाठी उत्तमही ठरेल.

**डिनर :** रात्रीचे जेवण झोपण्याच्या दोन ते तीन तासांपूर्वी घ्यायला हवे. याने अन्न पचायला वेळ मिळतो. रात्री जेवल्याशिवाय झोपू नये. डिनरमध्ये तेलकट पदार्थ खाऊ नयेत. डिनरमध्ये पोळी आणि कमी मसालेदार भाजी किंवा डाळ हवी. डिनरमध्ये घेतला जाणारा आहार लंचपेक्षा लाइट असायला हवा.

# शायनी केसांसाठी



**एक** चमचा ॲप्पल साइडर व्हिनेगरमध्ये १० थेंब आवळ्याचे तेल मिसळा आणि यात एक चमचा मध आणि एक चमचा पाणी मिसळा. आता या मिश्रणाने शाम्पूनंतर पाच मिनिटापर्यंत आपल्या डोक्याचा मालीश करा आणि मग गार पाण्याने केस धुऊन घ्या.

**हल्लीच्या जीवनशैलीत प्रत्येक जण लठ्ठपणामुळे त्रस्त आहे. वजन कमी करण्यासाठी कधी डायटिंग तर कधी व्यायाम तर कधी काय...तरी यश हाती लागत नसेल तर सर्वात मोठे कारण आहे की आपल्या डेली डायटमध्ये सामील अशा चार वस्तू ज्यामुळे आपल्या प्रयत्नांना यश मिळत नाहीये. जर या वस्तूंचे सेवन करताना आपण काळजी घेतली नाही तर परिणाम वाईट होऊ शकतात.**

# लठ्ठपणा कमी करण्यासाठी या चार पदार्थांपासून जरा लांबच राहा!



**मीठ :** आपण मिठाचे अधिक सेवन करत असाल तर हे आपल्या आरोग्यासाठी धोकादायक ठरेल. एका शोधाप्रमाणे एका दिवसात एक ग्रॅमहून अधिक मीठ सेवन केल्यास लठ्ठपणा वाढू शकतो. संतुलित प्रमाणापेक्षा अधिक मीठ खाणाऱ्यांचे वजन इतर लोकांपेक्षा अधिक असतं. तसेच पॅक्ड पदार्थांमध्ये मिठाचे प्रमाण अधिकच असतं.

**साखर :** गोड प्रत्येकाला आवडतं, परंतु अधिक प्रमाणात साखर नुकसान करते. कारण साखरेमुळे लठ्ठपणा जलद गतीने वाढतो आणि नंतर यावर नियंत्रण ठेवणं कठीण जातं. आपण दररोजच्या आहारात साखरेचे प्रमाण कमी करून वजन कमी करू शकता. चांगल्या आरोग्यासाठी पुरुषांनी दररोज ५० ग्रॅम आणि महिलांनी ७० ग्रॅमहून अधिक साखरेचे सेवन करू नये.

**तांदूळ :** आपण तांदूळ खाण्याचे शौकीन असाल तर लठ्ठपणा कमी करणे जरा अवघड आहे. पांढऱ्या तांदळात कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असल्यामुळे लठ्ठपणा वाढतो. वजन कमी करण्याची इच्छा असल्यास पांढऱ्याऐवजी ब्राऊन राईसचे सेवन करावे.

**मैदा :** मैदा आणि मैद्याचे खाद्यपदार्थ सेवन केल्याने लठ्ठपणा कधीच कमी होणार नाही. कारण मैद्यामुळे शरीरात ब्लड शुगर वेगाने वाढते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि कर्करोग यासारखे आजार होण्याची शक्यता वाढते.

# पाणी पिणाऱ्याची बुद्धी पाणीदार



**पाणी** प्यायल्यामुळे बुद्धी तेज होते आणि कोणत्याही माहितीचे आकलन पटकन होते, असे इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या एका प्रयोगात आढळले आहे. ईस्ट लंडन स्कूल ऑफ सायकॉलॉजी या संस्थेमध्ये पाणी आणि आकलन शक्ती यांच्या संबंधावर काही प्रयोग करण्यात आले, तेव्हा असे आढळले की माणूस पाणी पिऊन एखादे वाचन करतो तेव्हा त्याला वाचलेल्या मजकुराचे आकलन चांगले होते. याउलट एखाद्या व्यक्तीला भरपूर तहान लागलेली असताना सुद्धा प्यायला पाणी न देता वाचन करायला लावले तर किंवा एखादे काम करायला लावले तर ती व्यक्ती पाणी प्यायलेल्या व्यक्तीपेक्षा मंदपणे आकलन करते. या दृष्टीने या संस्थेने या लोकांवर प्रयोग केले आणि तहानलेल्या अवस्थेत त्यांना काही अवघड कामे सांगितली. तेव्हा त्यांना ती कामे व्यवस्थित समजली नाहीत. उलट भरपूर पाणी प्यायलेल्या लोकांना हीच कामे सांगितली तेव्हा त्यांना ती १४ टक्के जास्त वेगाने समजली.

यामागचे कारणे काय असावे, याचा छडा लावण्यात आला. तेव्हा असे आढळले की कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी आपल्या शरीरातील व्हॅसोप्रेसिन हे हार्मोन कार्यरत व्हावे लागते. कमी पाणी प्यायलेल्या अवस्थेत हे हार्मोन कार्यरत होत नाहीत आणि भरपूर पाणी प्यायल्यास ते कार्यरत होते.

**सकाळी उठल्या उठल्या काय खावे हा प्रश्न अनेकांना पडतो. भारतीयांमध्ये तर उठल्याबरोबर चहा घेणे ही जणू रीतच आहे. मात्र नुसता चहा घेणे आरोग्यासाठी घातक असल्याचे मागील काही काळापासून बोलले जात असल्याने त्यासोबत बिस्किटे, खारी, टोस्ट खाण्याचे प्रमाण वाढले. मात्र चहा-कॉफी दिवसाची सुरुवात करताना घेऊच नये, असे अनेक आहारतज्ज्ञ सांगताना दिसतात. त्यामागे काही महत्त्वपूर्ण कारणे नक्कीच आहेत. काही गोष्टी रिकाम्या पोटी खाल्ल्यास आरोग्याला दीर्घकालीन अपाय होऊ शकतात. त्यामुळे रिकाम्या पोटी कोणत्या गोष्टी खाणे किंवा पिणे टाळावे हे जाणून घेऊया...**



# रिकाम्या पोटी 'हे' पदार्थ खाणे टाळाच !

### चहा-कॉफी

सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी घेण्याची सवय अनेकांना असते. हे योग्य नाही, हे माहीत असूनही केवळ लहानपणापासूनची सवय म्हणून किंवा कुटुंबातून चालत आलेली परंपरा म्हणून ते चालूच ठेवतात. मात्र आरोग्यासाठी हे अजिबात चांगले नसून चहामुळे पोटातील ॲसिड वाढते. त्यामुळे अल्सर किंवा छातीतील जळजळ वाढते.

याप्रमाणेच उठल्यावर कॉफी प्यायल्याने फ्रेश वाटते असे अनेकांचे म्हणणे असते. मात्र शरीरातील हॉर्मोन्सचे संतुलन बिघडण्यास कॉफी कारणीभूत ठरते. एकदा हॉर्मोन्सचे संतुलन बिघडले की ते पूर्वपदावर येण्यास बराच वेळ लागतो.

### औषधे

झोपेतून उठल्यावर लगेच औषधे घेऊ नयेत, असा सल्ला डॉक्टरही आपल्या रुग्णांना अनेकदा देतात. अँटीबायोटिक्समधील घटक आतड्यांना त्रासदायक ठरू शकतात. यामुळे आतड्यांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. या औषधांमुळेही अल्सर होण्याची शक्यता असते.

म्हणून उठल्यावर औषधे घेऊ नयेत.

### मसालेदार पदार्थ

सकाळच्या नाश्त्याला तिखट किंवा मसालेदार पदार्थ खाऊ नयेत. मसाले किंवा मिरच्यांमुळे पोटात ॲसिडची निर्मिती होते. यामुळेही अल्सर होऊ शकतो. तिखट पदार्थ सकाळी सकाळी खाल्ल्यामुळे शौचासही त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो तेलकट आणि तिखट पदार्थ नाश्त्याला टाळावेत.

### बीयर आणि शीतपेये

सकाळी उठल्यावर शक्यतो कोणी शीतपेये आणि बीयर पीत नाही. मात्र सकाळपासून पोट रिकामे असले आणि एकदम जेवणादरम्यान शीतपेय किंवा बीयर घेतल्यास ते आरोग्यासाठी अतिशय हानीकारक ठरु शकते. रिकाम्या पोटी बीयर घेतल्यास जास्त नशा चढते आणि ते आरोग्यासाठीही हानीकारक असते. शीतपेयांमुळे मळमळणे, ॲसिडिटी अशा समस्या उद्भवू शकतात.

# आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सएॅप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सएॅप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सएॅप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सएॅप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सएॅप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सएॅप ने विंडोजसाठी एक नवीन ॲप आणला आहे. हा ॲप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सएॅप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सएॅपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सएॅप ॲप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ॲप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सएॅप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सएॅप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सएॅप ॲपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.

# पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक



**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

# लासलगावमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये असंतोष

## कृषी उत्पन्न बाजार समितीत 'शोले स्टाईल' आंदोलन... कांद्याला समांतर बाजारभाव योजनेची मागणी

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

कांद्याला समांतर बाजारभाव योजना तातडीने लागू करावी तसेच नाशिक जिल्ह्यातील आमदारांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधीद्वारे कांदा प्रश्नांसाठी आवाज उठवावा, यासाठी लासलगाव बाजार समितीच्या आवारातील पाण्याच्या टाकीवर चढत शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे) व छावा क्रांतिवीर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी 'शोले स्टाईल' आंदोलन केले. कांदा प्रश्नी जोरदार घोषणाबाजी करत शोले स्टाईल आंदोलन सुरू झाल्याची माहिती मिळताच शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाकी जवळ जमा होत पाठिंबा दर्शवला. लासलगाव बाजार समिती आवारात सकाळच्या सत्रात १०२० वाहना मधून विक्रीसाठी आलेल्या कांद्याच्या लिलावास सुरुवात झाली. कांद्याला किमान



४०० रुपये जास्तीत जास्त १४०१ रुपये तर सरासरी १००० रुपये असा दर मिळाला. मात्र, अकरा वाजेपर्यंत ५५२ वाहनांमधील कांद्याचा लिलाव पूर्ण झाला असताना बहुतांश कांद्याला ६०० ते ९०० रुपयां प्रति क्विंटल दर मिळत असल्याने संतप्त झालेल्या शिवसेना (ठाकरे)चे माजी पंचायत समिती सभापती शिवा सुराशे, संतोष पानगव्हाणे, शिवसेना (शिंदे)चे अभिजीत डुकरे, छावा क्रांतीवीर सेनेचे जिल्हाध्यक्ष गोरख संत, नवनाथ वैराळ यांनी या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक होत पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन सुरू केले. आंदोलनाची माहिती मिळताच बाजार समितीचे उपसभापती संदीप दरेकर, सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश कुमावत तसेच लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील, पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आंदोलनकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी नाशिक जिल्ह्यातील १५ आमदारांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधत विधिमंडळात लक्षवेधी मांडण्याची विनंती केली.



**...तर आंदोलन आणखी तीव्र करू!**


उपसभापती संदीप दरेकर सचिव नरेंद्र वाढवणे व सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी आंदोलनकर्त्यांना खाली येऊन चर्चेद्वारे मार्ग काढण्याची विनंती केल्यानंतर आंदोलनकर्ते पाण्याच्या टाकी वरून खाली उतरले आणि आंदोलन स्थगित केले. मात्र, सरकारने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला. लासलगाव बाजार समितीच्या आवारातील पाण्याच्या टाकीवर चढत शिवसेना (ठाकरे), शिवसेना (शिंदे) व छावा क्रांतिवीर सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी ह्यशोले स्टाईलह्व आंदोलन केले. कांदा उत्पादन खर्चात दिवसेंदिवस मोठी वाढ होत असताना कांद्याचे दरामध्ये होत असलेली घसरण आणि बाजार समितीत मिळणारे भाव अत्यंत कमी असल्याने बुधवारी कांद्याला बाजार भाव हजार रुपयांच्या आत आले. त्यामुळे शेतकऱ्यांनी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याचे लिलाव बंद पाडले होते. त्यानंतर दोनच दिवसांत आज बाजार समितीच्या आवारातील पाण्याच्या टाकीवर चढत शोले स्टाईल आंदोलनामुळे पुन्हा शेतकनांमध्ये असंतोष उफाळून आला.

---

## पालघरमध्ये बंद दगड खाणीत दुर्घटना
## दोन अल्पवयीन मुलांचा बुडून मृत्यू

■ **पालघर। प्रतिनिधी,**

पाण्याचा अंदाज न ओळखता आल्याने दोन मुलांचा जीव गेल्याची दुर्दैवी घटना पालघरमध्ये घडली आहे. मनोरजवळील टाकवहाल परिसरातील बंद पडलेल्या दगड खाणीत ही दुर्घटना घडली असून परिसरात शोककळा पसरली आहे. मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील मस्तान नाका उड्डाणपुलाजवळ असलेल्या खाणीत शुक्रवारी दुपारी काही मुले पोहण्यासाठी उतरली होती. मात्र पाणी किती खोल असेल याचा अंदाज न आल्याने दोन्हीही मुलांचा बुडून मृत्युज आला आहे. या घटनेत जिग्नेश विजय पवार (वय ८) याचा मृतदेह सापडला आहे. तर आयुष मुकेश पवार (वय १५) याचा शोध उशिरापर्यंत सुरू होता. यांचे कुटुंब हे मूळचे इंदोरचे असून रोजगारासाठी पालघरमध्ये मनोर परिसरात कामानिमित्त वास्तव्यास होते.



घटनेची माहिती मिळताच मनोर पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच वसई -विरार महापालिका अग्निशमन दलाकडून शोधकार्य राबविण्यात आले. या दुर्घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून बंद खाणींच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बंद पडलेल्या खाणींमध्ये साचलेल्या पाण्यामुळे धोका वाढत असल्याची चर्चा आहे. अशा ठिकाणी सुरक्षाव्यवस्था आणि इशारे फलक नसल्याने अपघातांची शक्यता वाढते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

---

## मुरूड आगारात सीएनजी गॅस पंप होणार नाही, सर्वेक्षणानंतर निर्णय... प्रवाशांत नाराजी

■ **मुरूड। प्रतिनिधी,**

मुरूड एसटी आगारात सीएनजी गॅस पंप उभारण्याचा प्रस्ताव अखेर नामंजूर करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सर्वेक्षणानंतर गॅस कंपनीने नकारात्मक अहवाल दिल्यामुळे मुरूड आगारात सीएनजी पंप होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रवासी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या मुरूड आगारात सीएनजी गॅस पंप उपलब्ध नसल्याने मुंबई–पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटी बसेसना अलिबाग किंवा इतर ठिकाणी जाऊन गॅस भरावा लागतो. यामुळे बससेवेच्या वेळापत्रकात अडथळे निर्माण होतात आणि बसेस नियोजित वेळेत पोहचत नसल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मुरूड आगाराला सीएनजी पंप देण्याबाबत सूचना करण्यात आल्याचे



"राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून सुनील तटकरे यांच्या प्रयत्नांतून सीएनजी पंपासाठी पाठपुरावा करण्यात आला होता. मुरूड आगारात पंप होणार नसल्याबाबत कोणतेही अधिकृत पत्र अद्याप प्राप्त झालेले नाही. मात्र जर प्रस्ताव नामंजूर झाला असेल, तर लवकरच खासदारांची भेट घेऊन पंप सुरू होण्यासाठी प्रयत्न केले जातील."
**-आराधना मंगेश दांडेकर, नगराध्यक्षा मुरूड नगरपरिषद**

सांगितले जाते. त्यानुसार अधिकाऱ्यांनी सर्वेक्षणही केले; मात्र अहवाल नकारात्मक आल्याने प्रस्ताव फेटाळण्यात आला. मुरूड आगारात सध्या ७ नवीन बसेस वगळता उर्वरित सुमारे ३० बसेस सीएनजीवर धावत आहेत. गॅस भरण्यासाठी अलिबाग येथे जावे लागत असल्याने वेळेचे नियोजन करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी असंख्य प्रवाशांना ताटकळत बसावे लागते. या संदर्भात पेण येथील विभाग नियंत्रक चौरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मुरूड आगाराच्या सीएनजी पंपासाठीचा प्रस्ताव महानगर गॅस लिमिटेडकडे पाठविण्यात आला होता. मात्र केवळ ३० गाड्यांसाठी स्वतंत्र पंप देणे शक्य नसल्याचे कारण देत कंपनीने प्रस्ताव नामंजूर केला. दरम्यान, मुरूड तालुक्यात केवळ एसटी बसेसच नव्हे तर अनेक खासगी वाहनेही सीएनजीवर धावत असल्याने गॅस कंपनीने संपूर्ण तालुक्याचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत प्रवासी वर्गाने व्यक्त केले आहे.

---

## चेंबूरमध्ये इमारतीचं बांधकाम सुरु असताना सहाव्या मजल्यावरून सहा कामगार कोसळले, एकाचा करुण अंत

घडलेल्या घटनेनुसार, सकाळी 9:45 ते 10 वाजताच्या दरम्यान अपघात झाला. चेंबूरमध्ये सुभाषनगर इमारत क्रमांक 36 मध्ये पार्किंगमध्ये भिंतीचे बांधकाम सुरु होते, तेव्हा सुरक्षा संरचनेत बिघाड झाल्याने सहाव्या मजल्यावरून सहा कामगार पडले. त्यापैकी एकाचा मृत्यू होऊन सहाजण गंभीर जखमी झाले आहेत.

■ **पुणे। प्रतिनिधी,**

मुंबईतील चेंबूर परिसरात शनिवारी बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत मोठी दुर्घटना घडली होती. सुभाषनगर येथील इमारत क्रमांक 36 च्या सहाव्या मजल्यावरून पार्किंग लिफ्टची भिंत बांधताना सहा कामगार पडले. या दुर्दैवी अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला तर पाच जण गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ निर्माण झाला. स्थानिक रहिवासी आणि घटनास्थळी उपस्थितांनी कामगारांच्या मदतीने सर्व जखमींना तात्काळ राजावाडी रुग्णालायत नेण्यात आले होते. तपासणीनंतर डॉक्टरांनी एका कामगाराला मृत असल्याचे घोषित केले. संबंधित प्रकरणात पाच जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या प्रकरणातील तपासात डॉक्टरांनी एका कामगाराला मृत घोषित केले. इतर पाच कामगारांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत, त्यापैकी काहींची प्रकृती ही चिंताजनक असल्याची माहिती समोर आली.

---

## लग्नास दिला नकार, स्कार्फने गळफास घेत तरुणीने संपवलं जीवन

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

प्रियकराने विवाह करण्यास नकार दिल्यानं तरुणीने स्कार्फने गळफास घेत जीवन संपवलं. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चौकशी केली. दरम्यान, संबंधित तरुणीचा मृतेदह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला होता. ही घटना उत्तर प्रदेशातील सदर बाजार पोलीस स्टेशन परिसरातील हकीकत नगर कॉलनी येथे घडल्याचे वृत्त आहे. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.



**तरुणीचा मृतदेह फासावर लटकलेल्या स्वरुपात आढळला**

पारूल ही सांगीताच्या घरी १० महिन्यांपासून घरकाम करत होती. ती संगीताच्याच घरी राहू लागली होती. रविवारी ती खोलीतून बाहेरच पडली नाही, तेव्हा खिडकीतून पाहिल्यावर तिचा मृतदेह फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आला होता. या घटनेनंतर घटनास्थळी लोकांनी गर्दी केली होती.

या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली, पोलिसांनी बंद दरवाजा तोडून मृतदेह खाली आणला. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाचा तपास करून पुरावे गोळा केले. प्राथमिक पोलीस तपासातून हे प्रेमप्रकरण उघडकीस आले. महिलेला प्रियकराशी लग्न करायचे होते, परंतु त्याने नकार दिला असता, त्या तरुणी मानसिकदृष्ट्या अस्वस्थ झाली होती. संबंधित प्रकरणात कुटुंबाने कोणतीही लेखी तक्रार दिली नसून पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**तरुणाचा विवाहास नकार, तरुणीनं संपवलं जीवन**

या प्रकरणात पोलिसांनी सांगितले की, महिलेचे तरुणाशी प्रेमसंबंध होते. संबंधित तरुणीला त्याच्याशी विवाह करायचा होता, पण त्याने विवाहास नकार दिल्याने प्रेयसीने स्कार्फने गळफास घेत जीवन संपवलं. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. मृत मुलीचे नाव पारूल उर्फ टीना असे होते.

---

## ८ वर्षांच्या लेकीला बाप दाखवायचा पोर्न, नंतर नको तेच... कोणाला सांगितल्यास द्यायचा 'ती' धमकी

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नागपूरमध्ये एका वकील वडिलांवर अश्लील व्हिडिओ दाखवून ८ वर्षांच्या दिव्यांग मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला करत अटक केली आहे. ही घटना नागपूरमधील मानकापूर पोलीस ठाण्याअंतर्गत घडली. तसेच ज्या मुलीसोबत असे हैवानी कृत्य केले ती मुलगी मासिकदृष्ट्या विकलांग आहे.

**वडील मुलीला अश्लील व्हिडिओ दाखवून करायचा नको तेच...**

वकील वडील आणि त्यांची पत्नी हे वेगळे राहत होते. कौटुंबिक कलहामुळे मुलगी ही तिच्या वडिलांसोबत राहत होती. या प्रकरणी मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, त्या तक्रारीत तिच्या आईने पीडितेवर लैंगिक अत्याचाराचा आरोप केला. पती तिला अश्लील व्हिडिओ दाखवून अनुचित वर्तन करायचा. यानंतर पत्नीने शिवीगाळ करत धमक्या देण्यास सुरुवात केली.

**याबाबत सांगितल्यास मुलीला गायब करण्याची दिली धमकी**

या घटनेची माहिती पत्नीने तिच्या ७० वर्षीय सासऱ्यांना सांगितली, ते म्हणाले की, तेव्हा सासरा म्हणाला की, 'ती त्याची मुलगी आहे तो काहीही करेल'. तिने याबाबत जर कोणाला काही सांगितल्यास मुलीला गायब करेन अशी धमकी दिली होती.

व्यथित झालेल्या महिलेनं पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. संबंधित प्रकरण हे अत्यंत गंभीर असून पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी दिव्यांग आणि मतिमंद मुलांसाठी शिक्षक आणि तज्ज्ञांची मदत घेतली होती. त्यानंतर चौकशी करून मुलीने लैंगिक अत्याचाराची पुष्टी केली. याआधारे पोलिसांनी वकील आणि तिच्या वडिलांविरुद्ध लैंगिक अत्याचार आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणात वकील वडिलांना अटक केली.



---

## बायकोच्या माहेरी गेला अन् मेहुणीला बघून नियत फिरली

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

आपल्या सासरी आलेल्या एका तरुणाने त्याच्या अल्पवयीन मेहुणीसोबतच घृणास्पद कृत्य केल्याची संतापजनक बातमी समोर आली आहे. संबंधित घटना बिहारच्या वैशाली जिल्ह्यातील लालगंज पोलीस स्टेशन हद्दीत घडली असून या धक्कादायक घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाल्याचं पाहायला मिळतंय.

मिळालेल्या माहितीनुसार, मुझफ्फरपूर जिल्ह्यातील मनियारी येथील रहिवासी असलेला विष्णू राम नावाचा तरुण लालगंज येथे आपल्या सासरच्या मंडळींना भेटायला बायकोच्या माहेरी गेला होता. या दरम्यान त्याने शेजारी राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. पीडिता ही नात्याने आरोपीची मेहुणी लागत असल्याची माहिती आहे. आता, आरोपी तरुणाच्या या कृत्यामुळे गावकरी त्याच्याविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करत आहेत.

प्रकरणाची माहिती मिळताच, लालगंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी तात्काळ आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांचं प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत कारवाई करत आरोपी विष्णू राम याला ताब्यात घेतलं. तसेच, पीडित अल्पवयीन मुलगी ही अस्वस्थ अवस्थेत आढळल्यानंतर महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या मदतीने तिला वैद्यकीय तपासणीसाठी सदर रुग्णालयात दाखल करण्यात आलं. आता पोलीस पीडितेचा जबाब नोंदवत असून पुढील कायदेशीर प्रक्रिया केली जात असल्याची माहिती आहे.

**पोलीस अधिकाऱ्यांनी दिली माहिती**

दरम्यान संबंधित प्रकरणाबाबत पोलीस अधिकाऱ्यांनी माहिती दिली की, या घटनेचा सर्व टेक्निकल आणि फॉरेन्सिक अँगलने पोलीस तपास करत आहेत, जेणेकरून न्यायालयात आरोपीविरुद्ध ठोस पुरावे सादर करता येतील. पुढे ते म्हणाले की, मेडिकल रिपोर्ट आणि एफएसएलकडून गोळा केलेल्या पुराव्यांच्या आधारे कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. आता, पोलिसांनी पीडितेच्या कुटुंबियांना निष्पक्ष चौकशी आणि न्याय मिळवून देण्याचं आश्वासन दिलं आहे.

---

## बॉयफ्रेंडसमोरच ७ जणांनी केला बलात्कार... पिकनिकला गेलेल्या तरुणीसोबत काय घडलं?

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आपल्या बॉयफ्रेंडसोबत फिरायला गेलेल्या एका २८ वर्षीय तरुणीवर सात जणांनी सामूहिक बलात्कार केला आहे. ही खळबळजनक घटना १९ फेब्रुवारी रोजी घडली असून, आरोपींनी केवळ अत्याचारच केला नाही, तर पीडितेकडून जबरदस्तीने पैसेही उकळले. याप्रकरणी पीडितेने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. आसाममधील सिलचरमधील ही घटना आहे.



**तृणमूल काँग्रेसच्या खासदाराची मागणी**

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. तृणमूल काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सुष्मिता देव यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षकांची भेट घेतली. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. 'या प्रकरणाचा तपास पारदर्शक पद्धतीने व्हावा आणि कोणताही दबाव न घेता गुन्हेगारांना शिक्षा मिळायला हवी,' असे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस सध्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

**बॉयफ्रेंडसमोरच तरुणीवर अत्याचार**

पीडित तरुणी सिलचर शहरापासून काही अंतरावर असलेल्या बायपास रोडवर आपल्या प्रियकरासोबत कारमध्ये होती. यावेळी एका एसयूव्हीमधून काही अज्ञात व्यक्ती तिथे पोहोचल्या आणि त्यांनी या दोघांवर हल्ला केला. आरोपींनी सुरुवातीला त्यांची चौकशी केली आणि त्यानंतर अचानक दोघांनाही पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. पीडितेच्या नातेवाईकांनी आरोप केला आहे की, सात नराधमांनी बॉयफ्रेंडच्या समोरच तरुणीवर एक–एक करून आळीपाळीने बलात्कार केला.

**ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले**

यानंतर आरोपींनी पीडितेला धमकावून त्यांच्यापैकी एकाच्या बँक खात्यात १० हजार रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून तिचा जबाबही नोंदवण्यात आला आहे. पीडितेने यातील दोन आरोपींना ओळखले असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्या दोघांना अटक केली आहे. उर्वरित पाच आरोपींची ओळख पटवण्याचे आणि त्यांना पकडण्याचे प्रयत्न पोलीस युद्धपातळीवर करत आहेत.

---

## पाणीपुरीत विष टाकूत गर्भवतीला मारण्याचा कट, नंतर जंगलात नेलं अन्... हादरवून टाकणारी घटना

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

झारखंडमधील गढवा जिल्ह्यातील रामकांडा पोलीस ठाणे परिसरातून एक खळबळजनक घटना उघडकीस आली. प्रियकराने आपल्या गर्भवती प्रेयसीला पाणी पुरीत विष देऊन मारण्याचा कट रचला. प्रेयसीला वेळीच कटाचा संशय आल्याने तिने आपला जीव वाचवला. याच प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रियकर केशरीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

**महिलेनं पाणीपुरी खाण्याची व्यक्त केली इच्छा**

पीडितेच्या म्हणण्यांनुसार, २१ फेब्रुवारी रोजी दुपारी ०२:०० वाजता आरोपीने तिला फोन करून काही तरी खाण्याबाबत सांगितले. त्यानंतर महिलेनं पाणीपुरी खावीशी वाटत असल्याची इच्छा व्यक्त केली. आरोपीने महिलेला पाणी पुरी खाऊ घातली होती, ज्यामुळे महिलेची प्रकृती बिघडली. नंतर तिला उलटी आल्यासारखं वाटू लागलं. तिच्या तोंडातून रक्तस्त्राव होऊ लागला होता.

**लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी अनेकदा शरीरसंबंध**

पोलिसांनी दिलेल्या संबंधित अर्जात पीडितेनं म्हटलं की, आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी अनेकदा शरीरसंबंध ठेवले होते. सुमारे सहा वर्षांपासून प्रेमसंबंधात होते. एका वर्षांपूर्वी त्यांना एक मूल झाले होते. गाव आणि समाजाने त्यांच्या नात्याला नाकारले आणि दोघांचे देखील बोलणं बंद झाले. काही महिन्यानंतर आरोपीने पुन्हा महिलेशी संपर्क साधला आणि लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी लैंगिक संबंध ठेवले. असा आरोप आहे. दरम्यान, संबंधित महिला ही पुन्हा गर्भवती राहिली होती. महिला आता आठ महिन्यांची गर्भवती असल्याचे सांगितले जात आहे. संबंधित प्रकरणात महिलेनं आरोप केला की, आरोपीने तिला फसवले आणि नंतर तिला सोडून देण्याचा कट देखील रचला होता.

**डॉक्टरडे नेण्याऐवजी तिला जंगलाकडे नेले**

सायंकाळी ४ वाजता आरोपीने दोन वेळा फोन करत डॉक्टरांकडे जाण्यास सांगितले. पण डॉक्टरांकडे नेण्याऐवजी त्याने तिला दुचाकीवरून बैरिया जंगलाकडे नेले. जंगलात सुमारे १०० मीटर अंतरावर, आरोपीने तिच्यावर हल्ला केला आणि तिची गळा दाबून हत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेदरम्यान, महिलेला डोळ्यावर गंभीर दुखापत झाली आणि ती बेशुद्ध पडली.

महिला शुद्धीवर आल्यानंतर जंगलाच्या दुसऱ्या टोकावर लपवण्यात यशस्वी झाली आणि भयभीत होऊन तिने संपूर्ण रात्र घालवली दुसऱ्या दिवशी सकाळी ती घरी पोहोचली आणि कुटुंबाला घटनेची माहिती दिली होती. पीडितेनं केलेल्या दाखल केलेल्या तक्रारीत रामकांड पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी साकेत केशरीला अटक केली आणि गढवा येथे न्यायालयीन कोठडी सुनावली.




---

## तरुणीवर अत्याचार... अश्लील व्हिडिओ बनवून व्हायरल केले

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

पांजाबच्या मोहालीतील खरारमध्ये हिमाचलच्या हिमाचलच्या एका २३ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. अश्लील व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याचा पीडितेनं आरोप केला. महिलेनं केलेल्या तक्रारीवरून खरार शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी देखील हिमाचल प्रदेशचा रहिवाशी असल्याची माहिती समोर आली.

**पीडितेचे अश्लील व्हिडिओ बनवून व्हायरल केले**

आरोपीचे ओळख नरेंद्र कुमार अशी झाली असून तो सध्या फरार आहे. या प्रकरणात पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या प्रकरणी पीडितेनं अनेक धक्कादायक दावे केले आहेत. आरोपी नरेंद्र कुमार हा बऱ्याच दिवसांपासून तिच्या संपर्कात होता. तिला अज्ञातस्थळी नेऊन तिचे अश्लील व्हिडिओ बनवल्याचा आरोप तक्रारीत केला.

**पीडितेला ब्लॅकमेल केल्याचा आरोप**

यानंतर त्याने संबंधित अश्लील व्हिडिओ बनवून व्हायरल करण्याची धमकी देखील दिली आणि ब्लॅकमेल केले. आरोपीने संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड केल्याचा पीडितेनं आरोप केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला आहे. या प्रकरणी पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. गेल्या काही वर्षांपासून देशातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या अशा घटना घडत असल्याने महिलांप्रती कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न उपस्थित होत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com